# संमेलनगरीत एकवटला ग्रंथप्रेमींचा महामेळा!

Posted: 10:02 PM, 04/01/2014 by Parashuram Patil



संत सोपानदेव साहित्यनगरी

विविध विषयांवरील पुस्तके...त्यावर मिळणाऱ्या आकर्षक सवलती...ई बुक्स उत्सव...चित्रांतून होणारे सासवडदर्शन...अन् या ग्रंथसोहळ्यात सहभागी होण्यासाठी उसळलेली विद्यार्थी, शिक्षक अन् साहित्यरसिकांची अलोट गर्दी...यामुळे साहित्य संमेलनाच्या ग्रंथनगरीत शनिवारी ग्रंथप्रेमींचा जणू महामेळाच अवतरला.

छत्रपती संभाजी महाराज ग्रंथनगरीत हे ग्रंथप्रदर्शन भरले आहे. प्रदर्शनात साहित्य प्रतिष्ठानचा ई-पुस्तकांचा स्टॉल लक्ष वेधून घेत आहे. आपला ई-पत्ता द्या आणि फ्री पुस्तक मिळवा, फक्त 200 रुपयांत 300 पुस्तके व बालसाहित्य 80 रुपयांत मिळवा, यांसारख्या सवलत योजनांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे. आत्तापर्यंतच्या 4 संमेलनांमध्ये आमचा सहभाग राहिलेला आहे. मात्र, या संमेलनात ई-साहित्याकडे रसिकांचा मोठा ओढा असल्याचे दिसत आहे. आम्हाला बसायलाही फुरसत नाही, अशी प्रतिक्रिया कौस्तुभ आपटे यांनी व्यक्त केली. व्हाईट लाईट पब्लिकेशनकडून 50 टक्के म्हणजेच अर्ध्या किमतीत पुस्तके मिळविण्याची संधी रसिकांना उपलब्ध झाली आहे. साहित्य रसिक या संधीचे सोने करत आहेत.

साधना प्रकाशनच्या पुस्तकांवर 40 टक्के, तर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या पुस्तकांवर 25 टक्के सवलत आहे. डॉ. दाभोलकर यांच्या तिमिरातून तेजाकडे, श्रद्धा अंधश्रद्धा, मती भानामती, एभ्से कैसे झाले भोंदू या पुस्तकांना विशेष मागणी आहे, अशी माहिती मनोहर पाटील यांनी दिली.

दिव्य कुरआनची किंमत यंदा 50 वरून 100 करण्यात आली आहे. मागील वर्षी 1400 कुरआनची विक्री झाली होती. यंदा प्रदर्शनात 1500 कुरआन ठेवण्यात आले असून, चांगला प्रतिसाद मिळण्याचे अपेक्षा झहीद तांबोळी यांनी व्यक्त केली. साथसंकेत प्रकाशनच्या योजनांची विकासगंगा या पुस्तकालाही पसंती मिळते आहे. गजेंद्र बढे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. ग्रंथाली प्रकाशनकडून पुस्तकांवर 40 टक्के सवलत देण्यात आली आहे. `आमचा बाप अन् आम्ही' या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पुस्तकाला तसेच डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यावरील `भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता' या पुस्तकाला चांगली मागणी आहे, असे श्रीधर पाटील यांनी सांगितले. शब्द प्रकाशनच्या `गाणाऱ्याचे पोर' या पुस्तकालाही रसिकांकडून पसंती मिळत आहे.

## बुक गंगाच्या ई बुक्सलाही प्रतिसाद

बुक गंगा डॉट कॉमच्या ई बुक्स योजनेलाही मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे मंदार जोगळेकर यांनी सांगितले. पुणे, मुंबईबरोबरच सातारा, सांगली, कोल्हापूर, नागपूर येथूनही मोठ्या प्रमाणात ऑर्डर मिळत आहेत. मराठीबरोबरच अन्य भाषांतही ही सुविधा उपलब्ध करून देणार असून, 24 तासांत घरपोच पुस्तके रसिकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.